**ठळक बातम्या**

नागपूरमधे उद्यापासून सुरू होणाऱ्या राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा विधानपरिषदेच्या सभापतींकडून आढावा; विरोधकांचा आजच्या चहापानावर बहिष्कार

सात राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या १२५ पायाभूत सुविधा प्रकल्पांचं संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

गोव्यात नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर; राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून संवेदना व्यक्त

**आणि**

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आजही मुंबई आणि दिल्ली विमानतळावरून २२० पेक्षा जास्त उड्डाणं रद्द

**<><><><><>**

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपूर इथं सुरूवात होत आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. अत्यावश्यक सुविधा, निवारा,पार्किंग, सुरक्षा व्यवस्था वायफाय, टपाल तसंच आहार याबाबत प्रशासनानं उत्तम पद्धतीनं नियोजन केलं असल्याचं त्यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. विधिमंडळ परिसरात अनावश्यक गर्दी होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, त्याचप्रमाणे मुंबईहून अधिवेशनासाठी येणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दोन विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. या वार्ताहर परिषदेला विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे देखील उपस्थित होत्या. महाराष्ट्र विधान मंडळामध्ये दोन्हीही सभागृहात विरोधी नेते पदाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचं वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे यांनी सांगितलं.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांच्या रामगिरी निवासस्थानी विधीमंडळ सदस्यांना चहापानासाठी आमंत्रित केलं आहे. विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. दोन्ही सभागृहातलं विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवण्यात आलं आहे. ही दोन्हीही पदं संविधानिक पद आहेत, रिक्त असल्यामुळे सरकारचा संविधानावर अविश्वास असल्याचा संशय निर्माण होतो. त्यामुळे आम्ही चहापानावर बहिष्कार टाकला असल्याचं विजय वडेट्टीवार म्हणाले.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सीमा रस्ते संघटनेच्या वतीनं उभारल्या जात असलेल्या, धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या १२५ पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केलं. हे प्रकल्प ७ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये उभारले जात आहेत.

हे पायाभूत सुविधा प्रकल्प देशासाठी सर्वोच्च बलिदान दिलेल्या भारतीय लष्कर आणि सीमा रस्ते संघटनेच्या जवानांच्या स्मृतींना समर्पित असल्याचं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. या प्रकल्पाअंतर्गत लेह मधील श्योक बोगद्याचाही समावेश आहे. या बोगद्यामुळे लडाखमध्ये कडाक्याच्या थंडीच्या काळासह बारमाही दळणवळणीय जोडणी उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षं झाल्यानिमित्त उद्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत या गीतावर चर्चा होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या चर्चेला सुरुवात करतील. दुपारी बारा वाजता चर्चेला सुरुवात होणार आहे. त्याचप्रमाणे निवडणूक सुधारणा या विषयावर ९ डिसेंबरला चर्चा होणार असल्याचं सर्वपक्षीय बैठकीत निश्चित झालं आहे.

**<><><><><>**

गोव्यात आरपोरा इथल्या एका नाईट क्लबमध्ये काल रात्री लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर पोहोचली आहे. मृतांमध्ये चार पर्यटकांसह बहुतांश

क्लबच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही आग गॅस सिलिंडर स्फोटामुळे लागल्याचा अंदाज स्थानिक अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या क्लबमध्ये अग्निसुरक्षा नियमांचं पालन केलं गेलं नसल्याचंही वृत्त आहे. आग लागलेल्या ठिकाणावरून सर्व मृतदेह बाहेर काढले असून, पोलीस पुढचा तपास करत आहे, त्यानंतरच पुढची कारवाई केली जाईल असं गोव्याचे पोलीस महासंचालक आलोक कुमार यांनी सांगितलं.

या क्लबला योग्य तपासणी न करता परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांसह, प्रत्येक जबाबदार व्यक्तीविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांसह अनेकांनी या दुर्घटनेतील जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी शोकग्रस्त कुटुंबांना बळ मिळो, अशी आशा व्यक्त करत जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही आपल्या संवेदना शोकाकुल कुटुंबासोबत असल्याचं म्हटलं आहे.

ही दुर्घटना अत्यंत दुःखदायक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या दुर्घटनेत आपले प्रियजन गमावलेल्यांसोबत आपल्या संवेदना असल्याचं म्हणत, जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थनाही त्यांनी केली आहे. आपण गोव्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत दूरध्वनीवरून चर्चा केली आणि परिस्थितीबद्दल समजून घेतलं, राज्य सरकार पीडितांना शक्य ती सर्व मदत पुरवत आहे असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई आणि दिल्ली विमानतळावरून २२०पेक्षा जास्त उड्डाणं रद्द केली आहेत. मात्र,  लवकरच आपली सेवा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू असून पंधराशेहून जास्त उड्डाणं चालवण्याचं आश्वासन इंडिगोने आपल्या निवेदनात दिलं आहे.

इंडिगो विमान कंपनीने आपल्या रद्द केलेल्या किंवा व्यत्यय आलेल्या विमानांमुळे नुकसान झालेल्या सर्व प्रवाशांचे पैसे आज रात्री आठ वाजेपर्यंत परत करावेत, असे निर्देश सरकारने दिले आहेत. तसंच, पुढच्या २४ तासांत तिकीट रद्द झाल्यामुळे किंवा विलंबामुळे प्रवाशांपासून विलग झालेलं त्यांचं सर्व सामान शोधून त्यांना परत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रवाशांच्या तक्रारींसाठी तसंच पैशांच्या परतफेडीसाठी स्वतंत्र सुविधा कक्ष सुरू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या कक्षांमार्फत संबंधित प्रवाशांशी संपर्क साधून परतफेडीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. गेल्या काही दिवसांपासून इंडिगो विमानसेवेच्या उड्डाणांचं वेळापत्रक विस्कळीत झाल्याने हजारो प्रवाशांचे हाल झाले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून विमान उड्डाणांवर झालेल्या परिणामामुळे भारतीय रेल्वे सेवेने आपल्या विविध विभागांमध्ये पुढच्या दोन दिवसांसाठी ८९ विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची घोषणा केली आहे. मध्य रेल्वे विभागात पुणे ते बेंगळुरू, पुणे ते दिल्ली आणि मुंबई ते दिल्ली यासह विविध मार्गांवर १४ विशेष गाड्या, पश्चिम रेल्वे विभागात भिवानी ते मुंबई आणि मुंबई ते शकुरबस्ती अशा विविध मार्गांवर ७ विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वे विभागात चेरलापल्ली ते शालीमार, सिंकदराबाद ते चेन्नई एगमोर आणि हैदराबाद ते मुंबई अशा तीन विशेष गाड्या चालवल्या जातील.

<><><><>

दक्षिण मध्य रेल्वेनं तिरुपती-साईनगर शिर्डी दरम्यान नवी साप्ताहिक रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी तिरुपतीहून दर रविवारी पहाटे चार वाजता तर शिर्डीहून दर सोमवारी साडे सात वाजता सुटणार आहे.

<><><><>

उत्तर प्रदेशात काल सुल्तानपूर इथल्या अयोध्या - प्रयागराज महामार्गावर काल पहाटे झालेल्या अपघातात जळगांव शहरातील एका महिलेचा मृत्यू झाला, तर ११ जण जखमी झाले. प्रशासनानं मृत महिलेचं पार्थीव तिच्या मूळ गावी पाठवण्यासाठीचं नियोजन केलं असून, जळगावमधले अधिकारी आणि लोकप्रतिनिधी सातत्यानं उत्तर प्रदेश प्रशासनाच्या संपर्कात आहेत.

<><><><><>

आज सशस्त्र सेना ध्वज दिन आहे. देशाचं संरक्षण करणाऱ्या जवानांचा आणि शहीदांचा सन्मान करण्यासाठी १९४९ पासून, ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून पाळला जातो. या दिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सशस्त्र सेना ध्वज दिन निधीसाठी त्यांचं एका महिन्याचं वेतन दान केलं. सर्व नागरिकांनी सशस्त्र सेना ध्वज दिन निधीत स्वेच्छेने योगदान देऊन देशाचे सैनिक, शहीद आणि त्यांच्या कुटुंबीयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचं आवाहन उपराष्ट्रपतींनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि आसपासच्या परिसरातील विविध ठिकाणी आज विशेष स्वच्छता मोहीम राबवली गेली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्वच्छता कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक या मोहिमेत सहभागी झाले होते.

<><><><><>

बीड जिल्ह्यात ईव्हीएम मशीन ठेवलेल्या स्ट्रॉंगरूमबाहेर निदर्शनं केल्याबद्दल आणि निवडणूक आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारासह इतर २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ डिसेंबर रोजी झालेल्या नगर परिषदेच्या निवडणुकांसाठी वापरलं जाणारं ईव्हीएम आणि नियंत्रण युनिट परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या इमारतीत ठेवण्यात आलं होतं. या इमारतीबाहेर ही निदर्शनं करण्यात आली होती.

<><><><><>

माजी लोकसभा अध्यक्ष पद्मभूषण सुमित्रा महाजन यांना १० डिसेंबर रोजी यावर्षीच्या 'ब्रह्मभूषण' पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. माजी खासदार आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते मुंबईत दादर इथं आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

<><><><><>

राज्यात तापमानात लक्षणीय घट झाली असून सर्वत्र थंडी वाढली आहे. आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. गोंदिया जिल्ह्यात तापमानाचा पारा घसरला असून पारा ९ अंशावर पोहोचला आहे. विदर्भात सर्वात कमी तापमान गोंदिया जिल्ह्यात नोंदवण्यात आलं आहे.